# नि.दि.दा.क्र.२१/२०२०, अर्ज निशाणी ६६ खालील आदेश
# (CNRNO.MHSI090001282021)

०१. अर्ज व त्यावरील प्रतिवादी क्र.०१ ते ०९ यांचा जबाब वाचला. उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद श्रवण केला.

०२. प्रस्तूतच्या अर्जान्वये वादी यांनी प्रतिवादी क्र.२२ ते १३५ यांची नावे वादपत्रातून कमी करणेस, तसेच, वादपत्रातील परीच्छेद क्र.०१ मधील क, ड व इ या मिळकती कमी करणेस व त्या अनुषंगाने दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेस विनंती केली आहे. त्यास प्रतिवादी क्र.०१ ते ०९ यांनी विस्तृत जबाब दाखल करुन आक्षेप नोंदवला आहे.

०३. अर्ज व जबाब तसेच उभयपक्षांच्या विद्वान विधिज्ञांचा युक्तिवाद लक्षात घेऊन संचिकेचे अवलोकन केले असता, वादींनी नि.क्र.६५ अन्वये दावा मिळकत परीच्छेद क्र.०१ मधील क, ड व इ या मिळकतीतील त्यांचा हक्क कायमस्वरुपी सोडून दिल्याबाबत निर्देशिका सादर केलेली आहे. जरी, प्रतिवादी क्र.०१ ते ०९ यांनी प्रतिवादी क्र.२२ ते १३५ हे आवश्यक पक्षकार असल्याने अर्जास आक्षेप घेतला असला तरी, कोणत्या मिळकतीच्या अनुषंगाने कोणाविरुध्द दाद मागायची हा अधिकार सर्वस्वी वादीचा आहे. जर, यदाकदाचित वादी प्रस्तूतच्या अर्जान्वये आवश्यक पक्षकारांची नावे कमी करत असेल तर भविष्यात सदर बाबीचा परीणाम वादीस भोगावे लागतील. उपरोक्त वरील बाबी लक्षात घेता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. करीता खालील आदेश.

**– <u>आदेश</u> –**

१. नि.क्र.६६ वरील अर्ज रक्कम रु.३००/–(रु. तीनशे फक्त) च्या खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती विहीत मुदतीत करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2023.01.03 18:16:18 +1000

स्थळ: देवगड ( एस.बी.वाळके )

दिनांकः ०३/०१/२०२३ दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.